**राज्यातील सहकारी सूत गिरण्यांची प्रकल्प**
**अहवाल किंमत सुधारीत करण्याबाबत**

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्रमांक : सूतगि ११०८/प्र.क्र.९१/टेक्स-१ (अ)
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ३० जून, २०११

वाचा :- १) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्र. सूतगि ११२०००/प्र. क्र.१२३/ टेक्स १ अ, दिनांक २ ऑगस्ट २००३
२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्र. सूतगि ११०८/प्र. क्र.९१/ टेक्स १ अ, दिनांक २५ नोव्हेंबर २०१०

**प्रस्तावना :-**

आठव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात ६१ सहकारी सूतगिरण्यांची शासकीय अर्थसहाय्यासाठी निवड करण्यात आली. या सहकारी सूत गिरण्यांच्या प्रकल्प अहवाल किमतीत एक समानता आढळून न आल्याने, सर्व प्रकल्पात एक वाक्यता रहावी यासाठी प्रकल्प अहवाल किंमत निश्चित करण्यासाठी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ, मुंबई आणि ऑल इंडिया स्पिनिंग मिल फेडरेशन, मुंबई यांचेकडून मॉडेल प्रकल्प अहवाल तयार करुन घेण्यात आला. समितीने २५,२०० चात्यांची क्षमता असणा-या सहकारी सूतगिरण्यांच्या बाबतीत मॉडेल प्रकल्प अहवालाची किंमत सन २००२-०३ च्या डी.एस.आर. वर आधारीत रु.५३.०० कोटी इतकी निश्चित करण्यास शासन निर्णय दिनांक २ ऑगस्ट,२००३ अन्वये मान्यता देण्यात आली होती.

डी.एस.आर. मध्ये झालेल्या वाढीच्या अनुषंगाने राज्यातील सहकारी सूतगिरण्यांकडून प्रकल्प किंमतीत वाढ करण्याबाबत मागण्या प्राप्त झाल्या. या मागण्यांच्या अनुषंगाने राज्यातील सहकारी सूत गिरण्याची प्रकल्प किंमत सुधारीत करण्यासाठी मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५ नोव्हेंबर २०१० च्या शासन निर्णयांन्वये समिती गठीत करण्यात आली. त्यानुसार राज्यातील सहकारी सूतगिरण्यांची प्रकल्प किंमत सुधारीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समितीने घेतलेल्या निर्णयानुसार शासन आता सन २०१०-११ च्या डी.एस.आर. प्रमाणे सहकारी सूतगिरण्यांची आदर्श प्रकल्प किंमत या शासन

निर्णयांन्वये रु.६१.७४ कोटी इतकी निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या संदर्भात बाबनिहाय खर्चाचे विवरणपत्र सोबत जोडण्यात येत आहे.

२. उपरोक्त सुधारित प्रकल्प किंमतीच्या संदर्भात आठव्या व दहाव्या पंचवार्षिक योजनेतील उभारणीखालील असलेल्या सूतगिरण्यांना त्यांनी पूर्ण केलेल्या शिर्षकनिहाय कामाच्या संदर्भात प्रो-रेटा पध्दतीने प्रकरणनिहाय नियमाप्रमाणे खर्चाची निश्चिती करुन संचालक, वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर, यांनी पुढील दोन महिन्यात सर्व सूतगिरण्यांचे प्रस्ताव शासनास सादर करावे. जेणेकरुन शासन निर्णय क्र. सुतगि-१२०० / प्र.क्र. १५३ /टेक्स -१, दि. १३ जून २००० अन्वये गठीत करण्यात आलेल्या सुकाणू समिती कडून याबाबत अंतीम निर्णय घेण्यात येईल

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०११०६३०१४३२०४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( प्र. बा. कडवे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

प्रति.

१) मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई -३२
२) मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई -३२
३) मा. राज्यमंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई -३२
४) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
५) प्रधान सचिव (नियोजन),मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
६) प्रधान सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
७) प्रधान सचिव (उद्योग), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
८) सचिव (सा.बां.वि.), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
९) मा. प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) यांचे स्वीय सहाय्यक, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई
१०) संचालक, वस्त्रोद्योग संचालनालय, जुने सचिवालय इमारत, जीपीओ समोर सिव्हिल लाईन्स,नागपूर ४४० ००१
११) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्या., मुंबई
१२) कार्यकारी संचालक, ऑल इंडिया स्पिनिंग मिल फेडरेशन, मुंबई
१३) श्री. दि. बा. पाटील,वेब कोऑर्डीनेटर, स.प.व व.वि. मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१४) निवड नस्ती (कार्यासन टेक्स १-अ /ब)

शासन निर्णय क्रमांक सूतगि ११०८/प्र.क्र. ९१/टेक्स १ (अ),
दिनांक - ३० जुन २०११ सोबतचे विवरणपत्र

## सुधारीत प्रकल्प किंमतीचा बाबनिहाय तपशिल

(रु. लाखात)

| अ.क्र. | बाब | सुधारीत किंमत (डीएसआर २०१०-११ नुसार) |
| --- | --- | --- |
| १ | प्रकल्प व यंत्रसामुग्री | ३१०२.७८ |
| २ | इमारत | १२१५ .३० |
| ३ | मिसलेनिअस फिक्स असेट्स | ८४५ .०० |
| ४ | मार्जिन मनी | ४१० .१७ |
| ५ | प्रोव्हीजन फॉर कॉन्टीजन्सी | २७३ .७७ |
| ६ | उभारणी पूर्व खर्च | २०८.१६ |
| ७ | स्टोअर्स अॅन्ड स्पेअर्स | ६१. ०० |
| ८ | जमीन व जमिनीचा विकास | ५८ .०६ |
| | **एकूण** | **६१७४.२४** |

C:\lotusswork\wordpro GR Tex I A RRD15